# अमरावती महानगरपालिका,अमरावती

## बाजार व परवाना विभाग

श्री अंबादेवी नवरात्रा उत्सव दरम्यान राजापेठ ते गांधी चौक पर्यंत दुतर्फा खुले प्लॉट वितरीत करण्या करीता कोटेशन फॉर्म मार्फत (बंद लिफाफा) ऑफर मुल्याची सुचना.

### कोटेशन सुचना

अमरावती महानगरपालिका क्षेत्रात दरवर्षी संपन्न होणाऱ्या श्री अंबादेवी नवरात्रा उत्सव दर्मियान मंजुर नकाशा प्रमाणे राजकमल चौक ते गांधी चौक पर्यंत रस्त्याचे दुतर्फा एकुण १५१ खुले प्लॉट ५*७=३५ चौ.फूट जागा इच्छुक व्यवसायीधारकांना व्यवसाय करण्या करीता वितरीत करण्यात येत आहे याकरीता इच्छुक व्यवसायीकांकडुन शासकीय दर रुपये ५६३५/- + १८% टक्के जि.एस.टी सह जास्तीत जास्त दराचे ऑफर मुल्याचे कोटेशन निविदा मागविण्यात येत आहे. या संबंधित अटी व शर्ती बाजार व परवाना विभागाचे राजापेठ मनपा हॉटेल ग्रेस इन मागे, झोन २ पहला माळा अमरावती या कार्यलयात पाहावयास मिळतील किंवा मनपाचे संकेत स्थळावर https://www.amravaticorporation.in वर माहिती उपलब्ध राहतील.

सविस्तर माहितीसह विहीत नमुन्यातील निविदा प्रपत्र तसेच अटी व शर्ती रु.५००/- + १८% जी.एस.टी रोखिने भरुन दि.१२/०९/२०२२ ते दि.२१/०९/२०२२ पर्यंत दु.०५:०० वाजता पर्यंत कोटेशन फॉर्म प्राप्त करता येतील. सिलबंद कोटेशन दि.२१/०९/२०२२ रोजी स.०५:०० वाजता पर्यंत बाजार व परवाना विभाग याकार्यालयात दाखल करता येतील. तसेच दि.२२/०९/२०२२ रोजी दु.१२:०० वाजता मा.उप आयुक्त (सा.) यांचे कार्यलयात उपस्थितांसमोर उघडण्यात येतील.

इच्छुकांनी विहीत प्रपत्रात आपली निविदा वर दिलेल्या मुदतीत वेळीच सादर करावी

अधिक्षक
बाजार व परवाना विभाग
महानगरपालिका,अमरावती

उप आयुक्त (सा.)
महानगरपालिका,अमरावती

Scanned with CamScanner

बाजार व परवाना अमरावती

# अमरावती महानगरपालिका,अमरावती

## बाजार व परवाना विभाग

श्री अंबादेवी नवरात्रा उत्संवा दरम्यान १० दिवसा करीता राजकमल चौक ते गांधी चौक पर्यंत रस्त्याचे दुर्तफा खुले प्लॉट वितरीत करीता बंद लिफाफा मार्फत दर मागविण्याबाबत सुचना.

### अटी व शर्ती

1) कोटेशन फॉर्मची किमंत रुपये ५००/- + १८% टक्के जि.एस.टी राहील.

2) कोरे कोटेशन फॉर्म बाजार व परवाना विभागात राजापेठ झोन क्र.२ मनपा हॉटिल ग्रेस इन मांगे अमरावती येथे दि.12 /09 /२०२२ ते दि.21 / 09 /२०२२ रोजी पर्यंत दुपारी ०४:००वाजे पर्यंत प्राप्त करण्यात यावे.

3) सिलबंद कोटेशन फॉर्म बाजार व परवाना विभागात दि. 21 / 09/२०२२ रोजी दुपारी ०५:०० वाजे पर्यंत दाखल करण्यात यावे.

4) दिनांक22 /09/२०२२ रोजी दुपारी 12 :00 वाजता कोटेशन फॉर्म मा.उप आयुक्त (सा.) यांचे कार्यालयात उपस्थितांसमोर उघडल्या जातील.

5) राजकमल ते गांधी चौक पर्यंतचे दुतर्फा आस्थपना धारका करीता ५ फुटचा रस्ता त्यांचे आस्थपना मध्ये येणारा करीता नकाशा मध्ये नमुद प्रमाणे आरक्षीत करण्यात आलेले आहे. दुकाना समोरील प्लॉट आरक्षीत करण्या करीता निर्धारीत जागे भाडे + जी.एस.टी भरणा निविदाचे अगोदर करण्यात यावी. अगोदर भाडा न भरल्यास सदर प्लॉट निविदा द्वारे वाटप करण्यात येईल. आरक्षीत प्लॉट करण्या करीता खुले प्लॉटचे समोर दुकानदारांना अर्जा सोबत नियमानुसार बाजार व परवाना विभागाचे अनुज्ञप्ती प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

6) राजकमल ते गांधी चौक पर्यंतचे दुतर्फा आस्थपनाचे खुले प्लॉट आरक्षीत झाले नंतर शिल्क असलेले खुले प्लॉट करीता कोटेशन पद्धतीने निविदा द्वारे वितरीत करण्यात येईल. शिल्क प्लॉटची यादी बाजार व परवाना विभागात उपलब्ध करण्यात येईल.

7) खुले प्लॉटची मागणी जास्त असल्याने एका अर्जदाराला एक प्लॉट वितरीत करण्यात येईल व सदर प्लॉट प्राप्त करीता निश्चित दरा पेक्षा जास्त दर कोटेशन फॉर्म मध्ये नमुद करावे सदर दर कमीत कमीत १००/- रुपये किंवा त्यापेक्षा जास्त वाढीव प्रमाणे वाढावे लागेल, कमी दराचे कोटेशन रद्द करण्यात येईल.

8) खुले प्लॉट करीता कोटेशन दर प्राप्त नसल्याने किंवा दर निर्धारीत दरापेक्षा कमी प्राप्त झाल्यास सदर खुले प्लॉटचे दर आजु बाजुचे प्राप्त खुले प्लॉटचे दरानुसार जे दर जास्त असेल त्यादराने वाटप करण्यात येईल.

9) कोटेशन फॉर्म भरतांना प्लॉट क्रमांक, प्लॉटचे दर स्पष्ठ नमुद करावे व नमुद ऑफर मुल्य दर + १८ % जि.एस.टी त्याच दिवसी रोख किंवा डी.डी स्वरुपात भरणा करणे बंधनकारक

Scanned with CamScanner

राहील. निर्धारीत दिवसी रक्कम न-भरल्यास सदर प्लॉट गर्जु अर्जदारांना वाटप करण्यात येईल.

10) कोटेशन फॉर्म भरतांना अर्जदाराने आधार कार्ड, पॅन कार्डची छायाप्रत व सुरु असलेले मोबाईल नंबर कोटेशन सोबत सलग्न करावे.

11) नवरात्रा यात्रा मध्ये स्टॉल धारकांना कोणताही अवैध्य,मादक पदार्थ, विशफोटक इत्यादी प्रकाराचे व्यवसाय करता येणार नाही. कायदा व सुव्यवस्थाचे दृष्टीने व्यवसाय करणे बंधनकारक राहील. याबाबतचे तक्रार प्राप्त झाल्यास कोणतीही नुकसान भरपाई नकरता त्वरीत स्टॉल रद्द करण्यात येईल.

12) नवरात्रा यात्रा स्टॉल धराकंना शासन तसेच महानगरपालिका मार्फत वेळोवेळी निर्गमीत केलेले नियमाचे पालन करणे बंधनकारक राहील. सदर स्टॉल समोर डस्टबीन ठेवणे बंधनकारक राहील. कोणताही प्रकाराचे कचरा रस्ता वर टाकु नये आढळुन आल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

13) खाध्य पदार्थ स्टॉल धारकांना अग्निशमन विभागाचे नाहरक्त घेणे बंधनकारक राहील. तसेच सदर जागेत घरेलु सिलेंडरचा वापर करता येणार नाही.

14) अर्जदारांना खुले प्लॉट वितरीत करण्यात येत आहे. त्यावर स्टॉल किंवा मंडप बाधण्याची जवाबदारी व लागणारे इतर सर्व खर्च अर्जदाराची राहील. तसेच स्टॉल / मंडप बाधता वेळी तात्पुर्ता स्वरुपाचे मंडप बाधण्यात यावी. रस्तावर खडे करण्याची परवानगी नाही. आढळुन आल्यास संपुर्ण नुकसान भरपाई वसुल करण्यात येईल.

15) कोणताही अर्ज स्विकार करण्याचा किंवा नकार करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचा राहील.

16) वरील नमुद कोणतीही अटीचा पालन न-केल्यास कोणतेही प्रकाराचे नुकसान भरपाई न-करता सदर प्लॉट रद्द करण्यात येईल.

अधिक्षक
बाजार व परवाना विभाग
महानगरपालिका,अमरावती

उप आयुक्त (सा.)
महानगरपालिका,अमरावती

Scanned with CamScanner

अमरावती महानगरपालिका अमरावती

बाजार व परवाना विभाग

नवरात्रा यात्रा करीता सर्व साधारण खुले प्लॉट निश्चित करण्यात येत आहे.

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | X | X | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| X | X | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ | X | X | ४२ |
| X | X | X | ४६ | ४७ | ४८ | ४९ | ५० | X | X | X | ५४ | ५५ | X |
| X | X | X | ६० | X | X | X | X | X | ६६ | ६७ | ६८ | ६९ | ७० |
| ७१ | ७२ | ७३ | ७४ | X | X | X | X | ७९ | ८० | ८१ | ८२ | ८३ | ८४ |
| ८५ | ८६ | ८७ | ८८ | ८९ | ९० | ९१ | ९२ | X | X | X | ९६ | ९७ | X |
| ९९ | १०० | X | X | १०३ | १०४ | १०५ | १०६ | X | X | X | X | १११ | ११२ |
| ११३ | X | ११५ | ११६ | ११७ | ११८ | ११९ | १२० | १२१ | X | १२३ | X | X | X |
| १२७ | X | X | १३० | १३१ | १३२ | १३३ | X | X | १३६ | X | X | X | X |
| १४१ | १४२ | X | X | X | १४६ | X | १४८ | १४९ | १५० | X | | | |

टिप :- X असे चिंन्हांकित दर्शविलेले खुले प्लॉट आरक्षीत आहे. सदर खुले प्लॉट करीता निविदा टाकण्यात येऊ नये निविदा टाकल्यास गृहित धरण्यात येणार नाही.

Scanned with CamScanner